**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ८
**सभावृत्तांत**

दिनांक – **२४/०८/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२४/०८/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती**
२. मा.गोफणे अनुराधा देविदास
३. मा.अपर्णा निलेश डोके
४. मा.अश्विनी विक्रम वाघमारे
५. मा. कुंदन अंबादास गायकवाड

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

सुचक – मा.अंबादास गायकवाड अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

मा.क्रीडा,कला,मा.क्रीडा,कलसाहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक-२४/०८/२०१८ रोजी होणारी पाक्षीक सभा (कार्यपत्रीका क्र.०८) शुक्रवार दिनांक-१४/०९/२०१८ रोजी दुपारी २.३० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

---------------

सभापती – सदरची सभा शुक्रवार दिनांक-१४/०९/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ८

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २४/०८/२०१८ ची तहकूब सभा **)**

**दिनांक – १४/०९/२०१८** **वेळ - दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक **२४/०८/२०१८** ची तहकूब सभा **शुक्रवार** दिनांक **१४/०९/२०१८** रोजी दुपारी २.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संजय बबन नेवाळे - सभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
४. मा.सुजाता सुनिल पालांडे
५. मा.गोफणे अनुराधा देविदास
६. मा.अपर्णा निलेश डोके
७. मा.अश्विनी विक्रम वाघमारे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.राऊत – प्र.सहा.आयुक्त, मा.मुंढे – शिक्षणाधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १०/०८/२०१८ व १३/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०७) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ३६ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १४/०९/२०१८ विभाग - क्रीडा
सुचक – मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक – मा.शैलेश मोरे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२५/२०१८ दि.२९/०६/२०१८

क्रीडा धोरणात एशियन क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. कु. नुपुर लक्ष्मण मोरे यांनी ७ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे र.रू २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी

समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ३७ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १४/०९/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२६/२०१८ दि.२९/०६/२०१८

क्रीडा धोरणात एशियनक्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. सौ.रूपाली गणेश तरवडे यांनी ७ वी एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे र.रू २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ३८ विषय क्रमांक – ०३

दिनांक – १४/०९/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शैलेश मोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४७२/२०१८ दि.०७/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.देवदत्त वसंत भारदे, चिखली ह्याने २६ व्या जागतिक योगासन चॅम्पियनशीप २०१८ अर्जेंटिना या स्पर्धेस जाऊन आल्याने त्याने योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेस र.रू.२,२०,०००/- स्वतः दिल्याने म.न.पा.नियमानुसार र.रु. १,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक – ०४

दिनांक – १४/०९/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शैलेश मोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४५८/२०१८ दि.२९/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्रीडा धोरणात एशियनक्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस र.रु.२,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. श्री.चंद्रकांत श्रीरंग पांगारे यांनी ७ वी

एशियन योगा स्पोर्टस चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे त्यांना र.रू.२,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६०६/२०१८
दिनांक : १७/०९/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.